माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कोणतीही माहिती विचारल्यानंतर जो पर्यंत त्यावर अंतिम न्यायनिर्णय होत नाही तोपर्यंत माहिती सुरक्षित ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०२१/प्र.क्र.५४/ सहा.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २५ ऑगस्ट, २०२२.

वाचा: १. द्वितीय अपील क्र. MHSICMU/ २०१९/ M/००४२०० प्रकरणी राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचे दिनांक ११.०१.२०२१ रोजीचे आदेश.
२. द्वितीय अपील क्र. MHSICMU/ २०१९/ M/००४५५२ प्रकरणी राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचे दिनांक २२.०७.२०२१ रोजीचे आदेश.

शासन परिपत्रक:-

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कोणतीही माहिती विचारल्यानंतर जो पर्यंत त्यावर अंतिम न्यायनिर्णय होत नाही तोपर्यंत माहिती सुरक्षित ठेवण्याबाबत परिपत्रक काढण्याचे मा. राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी, माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९(८)(क)(चार) अन्वये आदेश दिले आहेत. मा.राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या सदर निर्देशानुषंगाने सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना पुढीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

२. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्जदाराकडून कोणतीही माहिती विचारल्यानंतर जो पर्यंत त्यावर अंतिम न्यायनिर्णय होत नाही तोपर्यंत विचारलेली माहिती सुरक्षितपणे जतन करून ठेवण्यात यावी.

३. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनिक प्राधिकरणे तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करावे.

४ सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०२२०८२५१७०७०८४८०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JANA JIVA VALVI

Digitally signed by JANA JIVA VALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, ... cn=JANA JIVA VALVI
Date: 2022.08.25 17:12:20 +05'30

(ज. जि. वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य